**CNR. No. MHST**090006502021

## नियमित दिवाणी दावा क्र. ९८/२०२१ मधील निशाणी ५ खालील आदेश.

(बेबीजान मुल्ला वि. आनंदा कोरे व इतर)

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे प्रतिवादी यांनी गट नं. १०३७/११/ब व गट नं. १०३६/२ यामध्ये असलेल्या रस्त्यातुन ये जा करणेस वादीला हरकत अडथळा करु नये असा तात्पुरता आदेश मुळ दाव्याचा निकाल लागे पर्यंत मिळावा यासाठी दाखल केलेला आहे.

**प्रस्तुत अर्जातील वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः-**

२. मौजे कसबे रहिमतपुर, ता. कोरेगांव, जिल्हा सातारा येथील जमीन मिळकत नं. १०३७/१०पै/१ हि वादीची मालकी व कब्जे वहिवाटीची मिळकत आहे. सदर मिळकतीच्या चतुःसीमा खालीलप्रमाणे-

पुर्वेस - रस्ता

दक्षिणेस- यशवंत कोरे यांची मिळकत

पश्चिमेस- दादासो मुल्ला यांची मिळकत

उत्तरेस- रमेश माने यांची मिळकत

३. वरील मिळकतीमध्ये प्रतिवादीच्या जमीन मिळकत क्र. १०३७/११/ब मध्ये असलेल्या रस्त्याची अडवणुक प्रतिवादी करीत आहेत. तसचे सदर रस्त्यावरुन ये जा करणेस वादीस हरकत अडथळा करीत आहेत. सदर हरकत अडथळा हा प्रस्तुत अर्जाचा

वाद विषय आहे.

४. वादीने पुढे असे कथन केले आहे की, तीने तीची मिळकत सन १९९१ साली खरेदी केली. सदर मिळकतीमध्ये सन २००४ साली वादीने घर बांधले आहे व ती सदर घराचा नियमीत कर भरते. वादीच्या घर मिळकतीमध्ये ये जा करण्यासाठी शासन नियमा नुसार रस्ता उपलब्ध आहे. परंतु, प्रतिवादी हे दंडेलशाहीने शासन अधिकृत रस्त्यामधुन ये जा करण्याकरीता वादीस हरकत अडथळा करीत आहेत. त्यामुळे प्रतिवादी विरुध्द गट नं. १०३७ वरील सर्व हिस्सेदारांनी सन २०१४ साली अडवणुक करु नये म्हणुन योग्य त्या कार्यालयात तक्रारी अर्ज दाखल केले. तसेच तहसिलदार कोरेगांव यांच्याकडे एस. आर. नं. ४/२०१४ हा अर्ज दाखल केला होता.

५. मा. तहसिलदार यांनी सदर रस्त्याबाबत आदेश पारीत करुन प्रतिवादी यांनी रस्त्याची अडवणुक करु नये व १०३७/११/ब मधील रस्ता खुला करुन द्यावा म्हणुन आदेश पारीत केला आहे. वादी व प्रतिवादी यांना गट मिळकत क्र. १०३७/११/ब व १०३६/२/२ मधुन असलेल्या रस्त्या व्यतिरीक्त इतर कोणताही रस्ता नाही. प्रतिवादी हे वादीस हरकत अडथळा करीत आहेत. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन प्रतिवादी यांना गट नं. १०३७/११/ब व गट नं. १०३६/२/ब मधील असलेल्या रस्त्यावरुन ये जा करण्यास हरकत अडथळा करु नये असा तात्पुरता मनाई हुकुम मिळावा अशी विनंती केली आहे.

६. प्रतिवादीने निशाणी २७ वर त्याचे म्हणणे दाखल केले प्रतिवादींच्या मते

प्रस्तुतचा अर्ज खोटा व लबाडीचा असुन तो प्रतिवादींना मान्य नाही. प्रतिवादीच्या मते दावा मिळकतीचे वर्णन हे अपुर्ण व संदिग्ध असुन त्याचा अर्थबोध होत नाही. प्रतिवादी हे गट नं. १०३७/११/ब चे संपुर्ण मालक असुन सदर मिळकतीशी वादीचा कोणताही संबध नव्हता व नाही. वाद मिळकतीत प्रतिवादी हे पुर्वापार प्रमाणे मालकी व कब्जे वहिवाटीत आहेत. तसेच सदर मिळकतीत कोणत्याही प्रकारचा रस्ता अस्तीत्वात नव्हता व नाही. त्यामुळे प्रतिवादीने सदर मिळकतीत हरकत अडथळा करण्याचा कोणताही प्रश्न नाही. रस्ता केस नं. ४/२०१४ मध्ये तहसिलदार यांनी दिलेला निर्णय हा चुकीचा व बेकायदेशीर आहे. प्रतिवादी क्र. १ याने सदर निर्णया विरुध्द रे.दि.मु. क्र. १३७/२०२१ हा दिवाणी न्यायाधिश व. स्तर, सातारा यांच्याकडे दाखल केलेला आहे. सदर कामी न्यायालयाने दिनांक २०/०३/२०२१ रोजी जैथे थे चा आदेश पारीत केलेला आहे. सदर बाबीची माहीती असतानाही वादीने प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केलेला आहे.

७. प्रतिवादीने पुढे असे कथन केले आहे की, गट नं. १०३७/११/ब ही जमीन मिळकत प्रतिवादी यांची वडीलोपार्जीत असुन कौटुंबीक व्यवस्थे नुसार सदर मिळकतीचे प्रतिवादींनी आपसात वाटप करुन सदर मिळकतीतील पुर्व बाजुकडील उत्तर–दक्षिण हिस्सा प्रतिवादी क्र. १ वहिवाटतात व पश्चिम बाजुकडील उत्तर–दक्षिण रस्ता हे प्रतिवादी क्र. २ वहिवाटतात. सदर मिळकतीच्या उत्पन्नावरच प्रतिवादीचे कुटुंब अवलंबुन आहे. सदर मिळकतीशी प्रतिवादीचा कोणताही हक्क संबध नाही. वरील वस्तुस्थीती असताना आनंद चोरट, किसन जाधव, राजाराम जाधव, जगन्नाथ पिसाळ यांनी प्रतिवादी क्र. २ हणमंत व

लक्ष्मण माने यांच्या विरुध्द मामलेदार कोर्ट अँक्टचे कलम ५ प्रमाणे रस्ता मागणीसाठी अर्ज क्र. ४/२०१४ हा दाखल केला. सदरकामी प्रतिवादी क्र. १ यांना सामील न करता तहसिलदार निलंगा यांनी चुकीच्या निकषाच्या आधारे दिनांक ११/०८/२०१४ रोजी सदर केसचा निकाल दिला. सदर निर्णयाची कल्पना आल्यानंतर प्रतिवादी यांनी सदर तहसिलदार यांचा निर्णय दिवाणी दावा क्र. १३७/२०२१ मध्ये आव्हाणीत केलेला आहे. त्यामध्ये मा. न्यायालयाने जैसे थे चा आदेश पारीत केलेला आहे.

८. वादी यांनी त्यांचे गट नं. १०३७/१०/ब या मिळकतीमध्ये जाण्यासाठी गट नं. १०३७/७/ब व १०३७/११/अ मधील उत्तर–दक्षिण रस्त्याने व पुढे गट नं. १०३७/१० चे दक्षिणेकडील बाजुने आसणारा पुर्व–पश्चिम रस्ता आजही अस्तीत्वात असुन सदर रस्त्याचा वापर ते आज तागायत करीत आलेले आहेत. वादी यांना पर्यायी रस्ता उपलब्ध असताना ते कथीत न करता स्वच्छ हाताने वादी न्यायालयापुढे आलेले नाहीत. वादी यांना प्रतिवादींच्या मिळकतीतुन रस्ता मागण्याचा कोणताही अधिकार नाही. वादी यांच्या हक्कामध्ये प्रथमदर्शनी केस नाही. तसेच न्यायाचा समतोल ही वादीच्या बाजुने नाही. त्यामुळे प्रतिवादीतर्फे सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आली आहे.

९. वरीलप्रमाणे वादीचा अर्ज त्यावरील प्रतिवादींचे म्हणणे व इतर कागदपत्रे पाहता तसेच वादी व प्रतिवादी यांचे सुविद्य विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकता खालील मुद्दे माझे विचाराधीन आहेत. त्यावरील निष्कर्ष व त्यांची कारणमिमांसा खालीलप्रमाणे.

| अ.न. | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी सकृतदर्शनी केस त्याच्या बाजूने असल्याचे शाबीत करतात काय? | नाही. |
| २ | तुर्तातुर्त ताकिद न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल काय? | नाही. |
| ३ | न्यायाचा तोल त्याचे बाजूने असल्याचे वादी शाबीत करतात काय? | नाही. |
| ४ | काय आदेश? | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

वादीने अर्जातील मागणी प्रथमदर्शनी सिध्द करण्यासाठी खालील दस्तऐवज दाखल केले आहेत.

| अ. क्र. | कागदपत्रे | निशाणी |
|---|---|---|
| १. | वादीचा मौजे रहिमतपुर येथील गट नं. १०३७/१०पै/१ चा ७/१२ उतारा | ८ |
| २. | वादीचा मालमत्ता क्र. M1W4R6000294 चा मालमत्ता उतारा | ९ |
| ३. | वादीचा रजिस्टर खरेदी दस्त क्र. ३८०२/९९ सत्यप्रत | ३/१ |
| ४. | प्रतिवादी क्र. १ व २ चा मोजे रहिमतपुर येथील गट नं.तू १०३७/११/ब चा ७/१२ उतारा | ३/२ |

| | | |
|---|---|---|
| ५. | गट नं. १०३६ चा फाळणी नकाशा | ३/३ |
| ६. | गट नं. १०३७ चा भूमीअभिलेख कोरेगांव यांचा नकाशा | ३/४ |
| ७. | गट नं. १०३७ चा फाळणी नकाशा | ३/५ |
| ८. | मा. तहसिलदार कोरेगांव यांचेकडील एस. आर. नं. ०४/२०१४ चा दिनांक ११/०८/२०१४ चा आदेश | ३/६ |
| ९. | दिनांक १८/०७/२०२० चे वादीस मिळालेले नोटीस | ३/७ |
| १०. | मा. मंडलाधिकारी रहिमतपुर यांचे दिनांक २९/०४/२०१५ चे पत्र | ३/८ |
| ११. | वादीचे पतीचा दिनांक २२/१०/२०१३ चा जबाब | ३/९ |
| १२. | वादीचा दिनांक २१/०५/२०२१ चा रहिमतपुर नगरपरिषद रहिमतपुर यास दिलेला अर्ज | ३/१० |
| १३. | वादीचा दिनांक ३१/०५/२०२१ चा रहिमतपुर नगरपरिषद रहिमतपुर यास दिलेला अर्ज | ३/११ |
| १४. | वादीचे नावे पिठाची गिरणी असलेबाबतचा दाखला | ३/१२ |
| १५. | वादीचे व दावा मिळकतीचे फोटो एकूण– ६ | ३/१३ |

तसेच प्रतिवादीने खालील दस्तऐवज दाखल केले आहेत.

| **अ. क्र.** | **कागदपत्रे** | **निशाणी** |
|---|---|---|
| १. | सातारा येथील मे.दि.न्या.व.स्तर सो. यांचे कोर्टातील रे.दि.मु.नं. १३७/२०२१ ची निशाणी १ ची साक्षांकीत प्रत | ३० |

| | | |
|---|---|---|
| २. | सातारा येथील मे.दि.न्या.व.स्तर सो. यांचे कोर्टातील रे.दि.मु.नं. १३७/२०२१ ची निशाणी १९ ची साक्षांकीत प्रत | ३१ |
| ३. | वादीस जाणे–येणेस असणाऱ्या रस्त्याचे फोटो – एकूण ४ | |
| ४. | वरील फोटो काढले बाबतचे योगेश डिजीटल फोटो स्टुडीओ यांनी दिलेली पावती नं. ३०५ ची मुळ प्रत | |
| ५. | जागेवरील वस्तुस्थितीदर्शक कच्चा नकाशा | |
| ६. | जागेवरील वस्तुस्थितीदर्शक गुगल फोटो | |

१०. वादीच्या वतीने प्रस्तुत प्रकरणात असा युक्तीवाद करण्यात आला की, तहसिलदार यांनी रस्ता केस नं. ४/२०१४ मध्ये सर्वाकश परिस्थीतीचा विचार करुन प्रतिवादींना गट नं. १०३७/११/ब व १०३६/२ मधुन रस्ता खुला करण्याचा आदेश दिलेला आहे. त्यानुसार वादी हे सदर रस्ता आज तागायत वापरत आहेत. वादी यांना त्यांच्या मिळकतीमध्ये जाण्यासाठी कोणताही इतर पर्यायी रस्ता उपलब्ध नाही. प्रतिवादी हे त्यांच्या मिळकतीतुन असलेला रस्ता वापरण्यास वादी यांना हरकत अडथळा करीत आहेत. वादी यांच्या हक्कामध्ये प्रथमदर्शनी केस आहे. तसेच न्यायाचा समतोल व अपरिमीत हाणीचा मुद्दा हा वादीच्या बाजुने आहे. त्यामुळे वादी तर्फे सदरचा अर्ज मंजूर करुन प्रतिवादी यांना गट नं. १०३७/११/ब व १०३६/२ मधील रस्त्यास हरकत अडथळा करु नये असा तात्पुरता आदेश मिळण्यासाठी विनंती केली आहे.

११. याउलट प्रतिवादी तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, प्रतिवादी यांच्या

मिळकतीशी वादी यांचा कोणताही संबध नाही. तहसिलदार यांनी रस्ता केस नं. ४/२०१४ मध्ये दिलेला निर्णय हा पुर्णः चुकीचा व बेकायदेशीर आहे. प्रतिवादी क्र. १ याने सदर निर्णय हा दिवाणी दावा क्र. १३७/२०२१ मध्ये आव्हाणीत केला आहे. त्यामध्ये प्रतिवादी क्र. १ च्या हक्कामध्ये जैसे थे चा आदेश पारीत झालेला आहे. प्रतिवादीच्या मिळकतीमधुन जाण्यासाठी वादी यांना रस्ता नव्हता व नाही. वादी यांना त्यांच्या मिळकतीमध्ये जाण्यासाठी पर्यायी रस्ता उपलब्ध आहे. परंतु, वादी हा स्वच्छ हाताने न्यायालयापुढे आलेला नाही. वादीच्या हक्कामध्ये प्रथमदर्शनी केस नाही. तसेच न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने नाही. त्यामुळे प्रतिवादी तर्फे सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

## मुद्दा क्र. १ ते ३ करीता–

१२. वरील मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने त्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी एकत्रीत चर्चीले आहेत.

१३. प्रस्थापीत कायद्याचे तत्वानुसार तात्पुरता मनाई हुकुमाचा अर्ज निकाली काढत असताना प्रथमदर्शनी अथवा सकृतदर्शनी केस, न्यायाचा समतोल व अपिरीमीत हाणीचा मुद्दा हे घटक वादीच्या बाजुने आहेत का ? हे पाहणे आवश्यक असते. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात प्रथमदर्शनी केस, न्यायाचा समतोल व अपरिमीत हाणीचा मुद्दा हा वादीच्या बाजुने आहे का हे पाहणे आवश्यक आहे.

१४. प्रस्तुत प्रकरणात नमूद करण्यासारखी गोष्ट अशी की, वादी व प्रतिवादी

यांच्यामध्ये वादी ही जमीन मिळकत क्र. १०३७/१०पै/१ या जमीनीची मालक व कब्जेदार आहे याबाबत वाद नाही. तसेच वादी हिचे सदर मिळकतीमध्ये घर आहे हि बाब ही प्रतिवादीने नाकारलेली नाही. त्यामुळे वादी हे जमीन मिळकत क्र. १०३७/१०पै/१ या जमीनीमध्ये कब्जेदार असल्याचे दिसुन येते. प्रस्तुत अर्जाचा वाद विषय हा जमीन मिळकत क्र. १०३७/११/ब मधील रस्त्या संदर्भात आहे. त्यामुळे अर्जदाराने अर्जातील कथने प्रथमदर्शनी सिध्द केली का हे पाहणे आवश्यक आहे.

१५. प्रस्तुत प्रकरणात वादीने असे कथीत केले आहे की, रस्ता केस नं. ४/२०१४ च्या निकाला नुसार तहसिलदार यांनी गट नं. १०३७/११/ब व गट नं. १०३६/२ मध्ये असलेला रस्ता हा खुला करण्याचा आदेश दिलेला आहे. त्याप्रमाणे सदर रस्ता हा खुला करण्यात आला आहे. वादीने सदर अर्जासोबत तहसिलदार याचे निकालाची प्रत दाखल केलेली आहे. सदर तहसिलदार यांच्या निकालपत्रावरुन असे दिसुन येते की, तहसिलदार यांनी एस. आर. नं. ४/२०१४ मध्ये दिनांक ११/०८/२०१४ रोजी निकाल दिला व त्यांनी खालील प्रमाणे आदेश दिलेले आहे.

**आदेश –**

**१. '' अर्जदार यांची मागणी मान्य करण्यात येत आहे. कसबे रहिमतपुर येथील सर्वे नं. १०३६/२ व ११३७/११ब मधील पुर्वापार पासुन अस्तीत्वात असणारा रस्ता तालुका निरीक्षक भुमीअभिलेख, कोरेगांव यांच्याकडील नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे तात्काळ खुला करण्यात यावा असे सामनेवाला यांना या आदेशाद्वारे कळविण्यात येते.**

**२. सदर आदेशाची अंमलबजावणी अपिल कालावधी नंतर करण्यात यावी. ''**

१६. वरील आदेशावरुन असे दिसुन येते की, सर्वे नं. १०३६/२ व १०३७/११ब मध्ये असणारा रस्ता खुला करण्याचा आदेश तहसिलदार यांनी दिलेला आहे. पुढे वादी यांनी निशाणी ३ खाली दिनांक २७/०४/२०१५ रोजीचा अर्ज दाखल केलेला आहे. सदरील अर्जावरुन असे दिसुन येते की, आनंदा चोरट व जगन्नाथ पिसाळ यांनी एस. आर. नं. ४/२०१४ प्रमाणे झालेल्या आदेशाची अंमलबजावणी होण्यासाठी अर्ज दाखल केला होता. त्यानुसार दिनांक २९/०४/२०१५ रोजी तहसिलदार यांनी मंडल अधिकारी यांना कारवाई करावी असे आदेश दिल्याचे वादीने दाखल केलेल्या कागदपत्रावरुन दिसुन येते. परंतु, त्यानंतर मंडल अधिकारी यांनी काय कारवाई केली या विषयी कोणतेही दस्तऐवज वादीतर्फे अभिलेखावर दाखल करण्यात आलेले नाहीत. त्यावरुन एस. आर. नं. ४/२०१४ च्या न्यायनिर्णयाची अंमलबजावणी झाली का कसे हे स्पष्ट होत नाही. तसेच वादी याने दाखल केलेल्या कागदपत्रावरुन तहसिलदार यांच्या निर्णया नुसार रस्ता खुला केल्याचे दिसुन येत नाही.

१७. वादीने प्रस्तुत अर्जासोबत निशाणी ३(१०) वर नगराध्यक्ष व मुख्याधिकारी, रहिमतपुर यांनी दिलेले अर्ज दाखल केले आहेत. सदर अर्जामध्ये स्वतः वादी ही १०३७/११/ब मध्ये असलेला रस्ता हा प्रतिवादी यांनी बंद केलेला आहे व त्यामध्ये पिक घेतलेले आहे असे कथन केले आहे. तसेच वादीने दाखल केलेल्या फोटोमध्येही वादी कथीत करीत असलेल्या रस्त्यावर पिक असल्याचे दिसुन येते. त्यामुळे सद्य परिस्थीतीत

वादी कथीत करते त्याप्रमाणे रस्ता खुला आहे का ? या विषयी प्रश्नचिन्ह उपस्थीत होते. पुढे वादीने निशाणी १९ वर वादीने तहसिलदार यांच्याकडे दिलेला अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जावर तहसिलदार यांनी वादी यांना समक्ष न्यायालयामध्ये दाद मागण्याची कल्पना दिलेली आहे. मामलेदार कोर्ट ॲक्ट कलम ५ प्रमाणे वादी यांना रस्ता खुला करुन मागण्याचा अधिकार आहे. प्रथमदर्शनी तहसिलदार यांच्या एस. आर. नं. ४/२०१४ मधील निर्णयाप्रमाणे रस्ता खुला केल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे वादीने कथीत केल्याप्रमाणे रस्ता खुला आहे असे प्रथमदर्शनी म्हणता येणार नाही.

१८. प्रस्तुत प्रकरणात नमूद करण्यासारखी गोष्ट अशी की, विशिष्ट दिलासा कायदा १९६३ च्या कलम ४१ (एच) नुसार ज्यावेळी कोणत्याही सामान्य पद्धतीने तीतकाच प्रभावी दिलासा मिळू शकतो अशा वेळी मनाई हुकुम हा दिला जात नाही. प्रस्तुत प्रकरणात वादी हिला मामलेदार कोर्ट ॲक्टच्या तरतुदीप्रमाणे मागणी मागण्याचा अधिकार आहे. प्रस्तुत प्रकरणात दाखल कागदपत्रावरुन वादी कथीत करते त्याप्रमाणे रस्ता तहसिलदार यांच्या आदेशाप्रमाणे खुला झाल्याचे दिसुन येत नाही. तसेच प्रतिवादीने तहसिलदार यांचा आदेश सक्षम दिवाणी न्यायालयात आव्हाणीत केलेले आहेत. त्यामध्ये जैसे थे चे आदेश पारीत आहेत असे दिसुन येते. त्यामुळे प्रथमदर्शनी कस, न्यायाचा समतोल व अपरिमीत हाणीचा मुद्दा वादीच्या हक्कात आहे असे म्हणता येणार नाही.

१९. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी तर्फे त्यांच्या बचावाच्या अनुशंगाने ***धोंडीराम साळुंखे विरुध्द दिनकर साळुंखे*** *(2019 (1)* ***All M.R.*** *653)* या प्रकरणातील मा. उच्च

न्यायालयाच्या निष्कर्षाचा आधार घेतला. मा. उच्च न्यायालयाच्या वरील न्यायनिर्णयाचे अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी याने इतर हिस्सेदारांना याकामी सामील न केल्याचा बचाव घेतला नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणातील तथ्य व कथने ही वरील न्यायानिर्णयातील तथ्यापेक्षा वेगळी आहेत. त्यामुळे वरील मा. उच्च न्यायालयाचे निष्कर्ष याकामी लागु पडत नाहीत. एकंदरीतच वर चर्चीले वरुन वादीच्या हक्कामध्ये प्रथमदर्शनी केस, अपरीमीत हाणीचा मुद्दा व न्यायाचा समतोल नाही. त्यामुळे वादी हा तात्पुरता मनाई हुकुम मिळण्यास पात्र नाही. त्यामुळे मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र. ४ करीता.–</u>**

२०. एकंदरीत चर्चील्या मुद्यावरुन असे प्रथमदर्शनी स्पष्ट होते की, प्रथमदर्शनी केस ही वादीच्या बाजुने नाही. तसेच न्यायाचा समतोल व अपरिमीत हाणीचा मुद्दा ही वादीच्या बाजुने नाही. सबब, सदरचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. ४ साठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

## <u>आदेश</u>

१. निशाणी क्र. ५ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तूत अर्जाचा खर्च दोन्ही पक्षकारांनी आपापला सोसावा.

कोरेगाव. **(ए. बी. पाटील)**

दि. ०२/०८/२०२१ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर कोरेगाव.